Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021)
With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## :: परिपत्रक ::

**विषय : एप्रिल २०२३ मध्ये होणारी एमफिल/प्री-पीएचडी कोर्सवर्क सैध्दांतिक परीक्षा.**

उपरोक्त विषयास अनुसरुन सर्व संबंधितास आदेशान्वये कळविण्यात येते की, एप्रिल २०२३ मध्ये होणारी एमफिल/प्री-पीएचडी कोर्सवर्क सैध्दांतिक परीक्षा दि. २८ ऑगस्ट २०२३ ते दि. ३१ ऑगस्ट २०२३ या दरम्यान होणार आहे. सदरचे विषयनिहाय वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील https://www.unishivaji.ac.in/exam/Circulars या संकेतपत्त्यावर प्रकाशित करण्यात आले आहे.

तसेच परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या फ्रेश विद्यार्थ्यांची हॉल तिकिट संबंधित संशोधन केंद्रे/अधिविभाग यांच्या अधिविभागीय लॉगिनमध्ये उपलब्ध करण्यात आली आहेत. सदरची हॉल तिकिट प्रिंट करुन संचालक/समन्वयक/अधिविभागप्रमुख यांच्या स्वाक्षरीने संबंधित विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यात यावीत. तसेच परीक्षेच्या आवश्यक कामकाजाकरिता सर्व अधिविभागांना त्यांच्या लॉगिनमध्ये समरी व नेमलिस्ट उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

फिजिक्स, केमिस्ट्री, मॅथेमॅटिक्स, कॉमर्स ॲण्ड मॅनेजमेंट, हिंदी, मराठी या अधिविभागामधून इपीएस प्रणालीमधील विद्यार्थी परीक्षेकरिता प्रविष्ठ झालेले आहेत. सदर विद्यार्थ्यांना ऑड बैठक क्रमांक (Odd Seat Nos.) परीक्षा विभागाकडून देण्यात येईल. तथापि, संबंधितांना अधिविभाग स्तरावरुन हॉल तिकिटे उपलब्ध करुन देण्यात यावीत. तसेच अद्याप ज्या अधिविभागांकडून अपूर्ण अर्जाबाबत तोंडी कळविण्यात आलेली त्रूटीपूर्तता करण्यात आलेली नाही, त्यांचेकडून सदर त्रूटीपूर्ततेबाबतची कार्यवाही सत्वर व्हावी.

ज्या विद्यार्थ्यांनी नोंदणी करताना त्यांचे छायाचित्र व स्वाक्षरी प्रणालीमध्ये अपलोड केलेली नाही, अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या हॉल तिकिटवर फोटो व स्वाक्षरी दिसून येणार नाही. याकरिता संबंधित विद्यार्थ्यांनी (10 KB च्या आतील) स्कॅन छायाचित्र व स्वाक्षरी नमुना अधिविभागाकडे सत्वर सादर करावा व अधिविभागाकडून संबंधित विद्यार्थ्यांची स्कॅन केलेली (10 KB च्या आतील) छायाचित्रे व स्वाक्षरींचे नमुने परीक्षा विभागाकडे समक्ष सादर करावेत. जेणेकरुन संबंधित विद्यार्थ्यांना त्यांच्या हॉल तिकीट, गुणपत्रक, इ. परीक्षा दस्तावेजांवर छायाचित्र व स्वाक्षरी प्राप्त होईल.

डॉ. ए. एन. जाधव
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

बीएस्सी/एमएस्सी परीक्षा विभाग/६७-अ
दि. १७.०८.२०२३

प्रति,
मा अधिविभागप्रमुख/समन्वयक,
विद्यापीठ अधिविभाग/संशोधन केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

इंटरनेट सेल : सदरचे परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर Exam Circular येथे प्रकाशित करावे.
(प्रसारण कालावधी - प्रकाशनानंतर तीन आठवडे)